उद्यानतंत्र

# रोपवाटिकेतील रोपांच्या निर्मितीसाठी आवश्यक माध्यमे



**डॉ. लक्ष्मण सुरनर**
(मो.नं. ८८०६३८६३६४)

रोपवाटिकेमध्ये रोपकलमांची निर्मिती आणि संगोपन केले जाते. त्यासाठी अनेक माध्यमे वापरली जातात. यांना रूटिंग मीडिया असे म्हटले जाते आणि अशी वेगवेगळ्या प्रकारची माध्यमे बाजारामध्ये उपलब्ध असतात. प्रत्येक माध्यमाचे गुणधर्म हे वेगवेगळे आहेत. ती वापरण्याची पद्धतही थोडी वेगळी असते. जे माध्यम स्वस्त, सहजपणे उपलब्ध असते आणि वापरण्यास सुलभ असून मुळे फुटण्यास आणि त्यांची वाढ होण्यास उपयुक्त असते, असे माध्यम निवडावे.



**माती** : माती हे आपल्याकडील महत्त्वाचे माध्यम आहे. पोयटा माती म्हणून ती उपलब्ध असते. मातीमध्ये घन, द्रव, वायू अशा घटकांचे मिश्रण आणि भौतिक, रासायनिक व जैविक हे तीन प्रकारचे गुणधर्म असतात.

**वाळू** : खडकाचे, दगडाचे ०.०५ ते २.०० मि.मी. आकाराचे कण म्हणजे वाळू होय. क्वॉर्ट्झ सिलिका किंवा भिंतींना प्लास्टरसाठी वापरण्यात येणारी वाळू ही फाटे कलमांना मुळे फुटण्यासाठी उपयुक्त समजली जाते. वाळूमध्ये तणबिया, बुरशी असू शकतात. पण त्यामध्ये मूलद्रव्ये नसतात. वाळू वापरण्यापूर्वी ती स्वच्छ करूनच वापरावी.

**हिरवे शेवाळ (स्पॅग्नम मॉस)** : ही एक प्रकारची पावसाळ्यामध्ये जंगलात झाडाच्या खोडावर वाढणारी वनस्पती असून ती वजनाने हलकी असते, तसेच तिची पाणी धरून ठेवण्याची शक्ती अधिक असते. गुटी कलमासाठी हे एक महत्त्वाचे माध्यम आहे.

**व्हर्मिक्युलाईट** : हे एक मायका खनिज असून, गरम केल्यास खूप प्रसरण पावते. वजनाने हलके, आकुंचन- प्रसरण होण्याची चांगली कुवत असून ते आम्लविम्ल धारणेच्या मध्यम स्थितीत असते.

**कोकोपीट** : कोकोपीट म्हणजे नारळ फळावरील काथ्याचे कूट होय. पाण्याचा निचरा चांगला होतो, पाणी धरून ठेवण्याची चांगली क्षमता. रोपे निर्मितीबरोबरच हरितगृहामध्ये कुंड्यांमधील रोपे लावण्यासाठी याचा मोठ्या प्रमाणावर वापर केला जात आहे.

**लीफमोल्ड** : अर्धवट कुजलेला पालापाचोळा म्हणजे लीफ मोल्ड होय. हे एक उत्तम माध्यम असून तयार करण्यासाठी पालापाचोळा आणि माती यांचे थर रचून त्यातच अमोनियम सल्फेट, उपयुक्त बुरशी आणि जिवाणू यांची भर द्यावी. साधारणतः एका वर्षाने त्याचा वापर करावा.

**लाकडी भुसा** : लाकूड वखारीतील भुसा माध्यम म्हणून स्वतंत्ररित्या आणि मिश्रणासाठी वापरता येतो. भुसा वापरताना नत्राचा वापर करावा, म्हणजे भुसा कुजणे सुलभ होते.

**रॉकवूल** : वजनाने हलके, पाणी धरून ठेवणारे मूलद्रव्यविरहीत असे माध्यम आहे.

**कोळसा (चारकोल)** : कोळसा क्षारविरहित वजनाने हलका कार्बन उपलब्ध, पाण्याचा निचरा चांगला होतो.

**परलाईट** : लाव्हा रसाच्या खाणीतून याची निर्मिती होते. परलाईट हे वजनाने हलके असते. सामू ४ ते ४.५ दरम्यान असतो. तसेच यात मूलद्रव्यांचाही अभावच असतो.

## घ्यावयाची काळजी

* माध्यम बऱ्यापैकी दाट व घट्ट असावे जेणेकरून त्यात बिया, फाटे, कंद व्यवस्थित रुजू शकतील. * माध्यम हवा, पाणी यांचा समन्वय साधणारे असावे. * माध्यम वजनाने फार जड किंवा फार हलके नसावे. * माध्यम सहज उपलब्ध होणारे असावे. * माध्यम वाजवी दरात व हवे तेवढे उपलब्ध असावे. * माध्यम दुसऱ्या माध्यमात मिश्रण म्हणून वापरता यायला हवे. * माध्यमात क्षारता किंवा एखादा हानिकारक घटक नसावा. * माध्यमातून तणे, रोग, किडी यांची लागण होऊ नये. ■